# हिन्द मजदूर किसान पंचायत[महाराष्ट्र]

दूरध्वनी: ३५५३३६-७

२०४, राजा राममोहन रॉय मार्ग,
गिरगाव, मुंबई: ४०० ००४:

## राज्यव्यापी कार्यकर्ता परिषद

मंगळवार, दिनांक - १२ जानेवारी, १९८८
सकाळी ९-०० ते दुपारी ३-०० वा०

जागा - वीर सावरकर स्मारक, शिवाजी पार्क,
महापौर निवासाजवळ, दादर, मुंबई.

...०...

## ठ रा व :

बडे उद्योगपती, उत्पादक आणि मोठ्या वाहतूक कंपन्यांच्या दबावाला बळी पडून महाराष्ट्र शासनाने ३१ मे १९८८ पर्यन्त "जकात कर" रद्द करण्याची घोषणा करून जकात कराला पर्याय शोधण्यासाठी "कसवेकर कमिटीची" नियुक्ति केली. अलिकडेच ह्या कसवेकर कमिटीने "प्रवेश कराची" शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्रातील महानगरपालिका आणि नगरपालिकांचे जकातीच्या माध्यमातून मिळणारे वर्धिष्णु व विकसनशील उत्पन्न नष्ट करून कामगार-कर्मचा-यांच्या नोक-या, सेवा-शर्ती इतकेच नव्हेतर सर्वसामान्य जनतेच्या नागरी सुविधा अडचणींत आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. विकेन्द्रीकरणाचा उद्घोष करणारे महाराष्ट्र शासन महानगरपालिका, नगरपालिकाची व जकात वसूल करणा-या स्वायत्त संस्थाची स्वायत्तता संपुष्टांत आणून, जकात वसूल करण्याचे त्यांचे अधिकार हिसकाउन घेउन एकप्रकारे केन्द्रियकरणाला खतपाणी घालीत आहे. "जकाती" संदर्भात महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या ह्या भूमिकेचा आजची ही कार्यकर्ता परिषद तीव्र निषेध करीत आहे.

ज्या ज्या राज्यातील "जकात कर" रद्द करून पर्यायी व्यवस्था करण्यांत आली त्या त्या राज्यांतील कामगार-कर्मचा-यांच्या सेवा-शर्ती आणि नागरी सुविधांवर झालेल्या विपरीत परिणामांकडे डोळे झाक करून महाराष्ट्र शासनाने पर्यायी प्रवेश करावी अंमलबजावणी केल्यास, कामगार कर्मचारी, सर्वसामान्य जनता इतकेच नव्हे तर ज्यांना हाताशी धरून बड्या उद्योगपती-उत्पादकांनी "जकातीला विरोध केला" त्या छोटया व्यापा-यांवरहि प्रवेश कराच्या माध्यमातून भूर्दण्ड पडल्या शिवाय राहणार नाही.

....[२]...

महाराष्ट्र हिन्द मजदूर किसान पंचायतच्यावतीने आयोजित करण्यांत आलेली, आज दिनांक १२ जानेवारी १९८८ रोजी सकाळी ९-०० वाजता, वीर सावरकर स्मारक, शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे भरलेली ही "राज्यव्यापी कार्यकर्ता परिषद" ह्या ठरावा द्वारे महाराष्ट्र शासनाकडे अशी मागणी करीत आहे की, कळबेकर कमिटीचा अहवाल रद्द करून, जकातीला पर्यायच शोधावयाचा झाल्यास तो केवळ सुधारित जकातच असल्याने, जकात कर कायम स्वरूपी राहील, अशी अधिकृत घोषणा महाराष्ट्र शासनाने विनाविलंब करावी.

"जकात कर" वाचविण्यासाठी स्थापन झालेल्या नागरी सेवा रक्षा समितीच्या वतीने "जकातीबाबत" होणाऱ्या सर्व कार्यक्रमास व आगामी आंदोलनास ही परिषद सक्रीय पाठींबा व्यक्त करीत आहे.

सूचक : जगदिश देशपांडे

अनुमोदक : पद्नाभ शेट्टी